सं. फौ. प्र.क्र. – ३२८२/२०२०**(नि.क्र.५ खाली)**
**प्रविण ..विरुध्द.. सुभाष +१**

आरोपीचे विधीज्ञ यांनी दस्तऐवजास निशानी देण्यास औपचारीक हरकत घेतली. साक्षीदाराने पुराव्यामध्ये शपथेवर सांगीतले आहे की, दाखल केलेल्या दस्तऐवजातील मजकूर बरोबर आहे. ते दस्त त्याचेसमक्ष तयार करण्यात आलेले व धनादेशावर आरोपींची स्वाक्षरी आहे. सबब, फिर्यादीने दाखल केलेल्या दस्ताना, धनादेश **नि.क्र. २३ व २४**, बँक मेमो नि.क्र. **२५ ते २८**, नोटीस **नि.क्र. २९**, पोस्ट पावती **नि.क्र. ३० व ३१**, नोटीस उत्तर **नि.क्र. ३२** देण्यात येते.

**उलटतपास आरोपीतर्फे श्री. ए.ए. जुनघरे, विधीज्ञ मार्फत** :–

२. माझे घरामध्ये मी तसेच पत्नी, आई व दोन मुले असे राहतो व दोन्ही मुले शिक्षण घेत आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझ्याकडे एक चार चाकी व दोन दुचाकी आहे व मी चार चाकी वाहन सन २०१९ मध्ये खरेदी केली आहे. हे म्हणणे खरे आहे की, ते चार चाकी वाहन सन २०१५ चे असुन ते वाहन मी जुने सन २०१९ मध्ये घेतले आहे. हे म्हणणे खरे नाही की, ते वाहन मी रुपये ८,००,०००/- घेतले होते. ते वाहन मी रुपये ७,२२,०००/- मध्ये घेतले होते. हे म्हणणे खरे आहे की, माझे कुटूंबातील सर्व सदस्य वापरतात. हे म्हणणे खरे नाही की, माझा मासिक खर्च रुपये ३०,०००/- ते ४०,०००/- आहे. माझा पेट्रोल, फोन बिलचा मासिक खर्च रुपये ३,०००/- ते ४,०००/- आहे.

**प्रश्न** - मुलांच्या शिक्षणाचा व घर खर्च किती आहे ?
**उत्तर** – एकत्र कुटूंब असल्याने सर्व कुटूंबाच्या उत्पन्नातून खर्च केला जातो.

This is a True Copy of the Court Records Online. Proofed @ eCourtsIndia.com/TrueCopy/MHAM030054742020-orderno-1.pdf

www.ecourtsindia.com

माझे चारचाकी वाहनाचा डिझेलचा खर्च बाहेर गावी गेलो तरच रुपये ५००/- ते १०००/- येतो.

३. हे म्हणणे खरे आहे की, माझी नोकरी कॉन्ट्रॅक्ट बेसीस वर आहे व मी चतुर्थ श्रेणी नौकरदार आहे व मला दरमहा रुपये २०,०००/- वेतन आहे. त्याबाबत मी दस्त दाखल करु शकतो. हे म्हणणे खरे आहे की, माझे नावे घर नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी उत्पन्न कर भरत नाही.

४. हे म्हणणे खरे आहे की, मला दिनांक ०१/०९/२०१८ रोजी रुपये २२,०००/-, दिनांक २९/०१/२०१९ रोजी रुपये ६०,०००/- आर.टी.जी.एस. ने मिळाले आहे. हे मला आठवत नाही की, आरोपीने दिनांक ०१/१०/२०१८ रोजी रुपये १५,०००/- आर.टी.जी.एस. ने दिले होते की नाही. हे म्हणणे खरे नाही की, फिर्याद दाखल झाल्यानंतर रुपये ५६,०००/- दिनांक ११/०३/२०२० रोजी आर.टी.जी.एस. ने मिळाले. मी माझा खाते उतारा दाखल करु शकतो.

५. मला आरोपी क्र. २ चे वडीलांचे, भावाचे नाव माहित नाही.
**प्रश्न** - आपण कर्ज दिल्यास दस्त लिहून घेतो व कोरा धनादेश घेतो ?
**उत्तर** - मी कर्ज दिलेले नाही.
हे म्हणणे खरे नाही की, मी वाहनाची खरेदी करण्याकरीता सन २०१९ मध्ये खात्यामधून रक्कम काढली होती. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीस दिनांक ०३/११/२०१९ रोजी रक्कम दिलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझे आरोपीसोबत कौंटूंबिक संबध होते हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी एप्रिल-२०१८ मध्ये आरोपीस रक्कम रुपये ७०,०००/- दरमहा १० टक्के व्याजाने दिले होते. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने सर्व रक्कम परत केलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीस व्याजाने रक्कम देताना कोरे

This is a True Copy of the Court Records Online. Proofed @ eCourtsIndia.com/TrueCopy/MHAM030054742020-orderno-1.pdf

धनादेश घेतले होते व त्यानंतर आरोपी सोबत व्यवहार झाला नाही व त्यानंतर सुध्दा आरोपीस वाद धनादेश परत दिलेले नाहीत व वाद धनादेशचा दुरुउपयोग केलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी फिर्याद दाखल केली आहे.

**उलटतपास - संपला**

सा.वा.दा.ब.अ.क.केले.

श्रवणोत्तर स्विकृत

Pritesh Sumtilal Bhandari
Digitally signed by Pritesh Sumtilal Bhandari
Date: 2022.12.02 13:58:53 +0530

**(प्रितेश भंडारी)**

दिनांक : ०२.१२.२०२२

न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग
न्यायालय क्र. ६, अमरावती.

www.ecourtsindia.com
This is a True Copy of the Court Records Online. Proofed @ eCourtsIndia.com/TrueCopy/MHAM030054742020-orderno-1.pdf